## प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्य व संशोधनाचे समालोचन

# प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्य व संशोधनाचे समालोचन

२.१ प्रस्तावना

२.२ संबंधित साहित्याचा अभ्यास

२.३ संबंधित संशोधनाचे समालोचन

२.४ समारोप

## प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्य व संशोधनाचे समालोचन

### २.१ प्रस्तावना :-

संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्वपूर्ण ज्ञान विविध ग्रंथामध्ये आहे त्याचा थोडक्यात उल्लेख करणे आवश्यक असते. संशोधनास पूरक बाबींचा यात समावेश केला जातो. पुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी संबंधित उपलब्ध साहित्याचे वाचन, मनन व नंतर लिखित स्वरुपात आढावा घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीत बदलेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधित उपलब्ध साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे असते. त्याचबरोबर त्या विशिष्ट संशोधन विषयाच्या किंवा समस्येच्या संबंधी यापूर्वी कोणते संशोधन झाले आहे. त्याचे वाचन, मनन व लिखित स्वरुपात आढावा घेणे आवश्यक असते. त्यापैकी कोणते निष्कर्ष पूरक आहेत कोणते वेगळे आहेत याचाही आढावा घेणे उपयुक्त ठरते.संशाधनासाठी योग्य दिशा निर्देशन व अचूक होण्याकरिता संबंधित संशोधनाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याची गरज असते.

कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास या संशोधन अभ्यासासाठी कनिष्ठ महाविद्यालयांच्या संदर्भात आतापर्यंत झालेल्या पाहणीचा अभ्यास केला. या अभ्यासाची नोंद खाली दिली आहे. शैक्षणिक प्रशासनाच्या बाबतीत अनेक संशोधकांनी संशोधन केलेले आहे. संशोधनाचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१) शैक्षणिक संस्था व संघटना

२) पर्यवेक्षण व तपासणी

३) शिक्षणाच्या शाखा

४) शिक्षणातील समस्या

५) नियोजन व प्रशासन

६) संघटकांचे वर्तन

प्रस्तुत संशोधन नियोजन व प्रशासन या वर्गात मोडते. प्रस्तुत विषयावर अन्य कोणी संशोधन केले आहे का ? केले असल्यास कोणत्या प्रकारचे आहे ? त्याची उद्दिष्टे कोणती? त्याची कोणत्या पध्दतीचा अवलंब केला ? तसेच त्यांनी कोणते निष्कर्ष काढले ? या सर्व घटकांचा आढावा घेण्याचे संशाधकाने ठरविले.

त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात संशोधन केलेल्या संशाधनाची माहिती विविध ग्रंथांतून घेतली. कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास यावर कोणीही संशोधन केलेले आढळून आले नाही. या संशोधनाच्या अनषंगिक अशा काही संशोधनाचे समालोचन केले आहे. परंतू संबंधित संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केल्याशिवाय संबधित संशोधकाचे समालोचन करणे इष्ट नसल्याने संबंधित संदर्भ ग्रंथाच्या अभ्यासविषयी माहिती खाली दिली आहे.

२.२ <u>संबंधित साहित्याचा अभ्यास</u> -

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी खालील संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला आहे.

१)<u>Research in Education</u> (1982), John W. Best - New Delhi.

Page - 1-158, 21-166.

या संदर्भ ग्रंथातून खालील माहिती मिळाली.

<u>संशोधनाच्या पध्दती व साधने</u> -

१) निरीक्षण

२) मुलाखत

वरील मुद्दयांना अनुसरुन अभ्यास केला.

* <u>संशोधनाचा अर्थ</u> -

१) ज्ञानाकरिता शोध

२) परिकल्पना

३) नमुना निवड

४) संशोधनाचा हेतू

वरील मुद्दयांना अनुसरुन अभ्यास केला.

२) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (१९८७),मुळे,उमाठे

नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, म.गांधी मार्ग. पृष्ठे - ११-१५, ४४-४६, ११०-११७.

या संदर्भ ग्रंथातून संशोधनाविषयी खालीलप्रमाणे मार्गदर्शन मिळाले.

* ज्ञान, विज्ञान व संशोधन :-

१. संशोधन प्रक्रियेची वैशिष्टये

२. शैक्षणिक संशोधनाचे महत्व

* समस्येची निवड -

१. वाचन व अभ्यास :- संशोधनाला उपयुक्त अशा समस्येची निवड करण्यासाठी विशिष्ट क्षेत्रातील पूर्वी झालेल्या संशोधनाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असते.

क) संशोधन ज्ञानकोष

ख) शब्दकोष

ग) वार्षिके

घ) संशोधन विषयक नियतकालिके

च) बुलेटिन, हस्तपुस्तिके, मार्गदर्शिका, गोषवारे

छ) प्रशासनाकडून होणारी प्रकाशने

ज) संशोधन प्रतिकृती

झ) झालेल्या संशोधनाचा गोषवारा व सूची

* सर्वेक्षण पध्दती :-

१. स्वरुप

२. हेतू

३. वैशिष्टये

४. प्रकार

५. विद्यालय सर्वेक्षण

६. प्रमुख पायऱ्या

३) शैक्षणिक संशोधन पध्दती (१९९४),वि.रा. भिंताडे

पुणे, नुतन प्रकाशन. पृष्ठे - १३२-१३८, १४०-१४८

या संदर्भ ग्रंथातून संशोधनाच्या संदर्भात खालील घटकांचा अभ्यास केला.

* शैक्षणिक संशोधनाचा आराखडा

१. पथदर्शक अभ्यास

२. परिकल्पना, परिकल्पनेचे प्रकार

३. चांगल्या परिकल्पनेची वैशिष्टये

* माहिती संकलन प्रक्रिया, निर्वचन, शिफारशी

१. माहिती संकलन

२. माहितीवर विविध प्रक्रिया - तपासणी, संस्करण, सांकेतीकरण, वर्गीकरण, सारणीकरण पृथक्करण, संख्याशास्त्राचा उपयोग, विशदीकरण, निर्वचन.

* अहवाल लेखन व त्याचे मूल्यमापन :-

१. अहवाल लेखनाचे हेतू

२. अहवाल लेखनाची भाषा कशी असावी व कोणकोणत्या सूचना ध्यानात ठेवाव्यात.

३. अहवाल लेखनाचे तीन प्रमुख विभाग व त्यातील उपविभाग

४. संदर्भ साहित्य व यामधील फरक

५. अहवालाच्या टंकलेखनाचे नियम व संख्यालेखन.

४) शैक्षणिक संशोधन (१९७५),भा.गो. बापट

पुणे, नूतन प्रकाशन. पृष्ठे - ९२, ९३, १४८ ते १६२.

* <u>संशोधन पध्दती</u> -

१. ऐतिहासिक पध्दती

२. वर्णनात्मक पध्दती

३. प्रायोगिक पध्दती

* <u>वर्णनात्मक पध्दतीचे प्रकार</u> -

१. सामान्य सर्वेक्षण ,२. शालेय सर्वेक्षण, ३.लोकमत सर्वेक्षण,४. सामाजिक सर्वेक्षण ५.समाज अभ्यास,६. अनधावन

<u>संशोधनाची साधने</u> -

१. प्रश्नावली, २. मुलाखती

३. निरीक्षण ४. भेटी व चर्चा

वरील मुद्दयांच्या संदर्भात प्रस्तुत संदर्भ ग्रंथचा अभ्यास केला आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात इतर संशोधनाचा अभ्यास करणे आवश्यक असल्याने संशोधकाने पुढील ग्रंथातून संबंधित संशोधनाचा अभ्यास केला आहे. (शैक्षणिक संशोधनाचा अभ्यास करण्याकरिता वापरलेले संदर्भ ग्रंथ खालील प्रमाणे आहेत.)

1. M.B. Buch (Editor) (1974)
   <u>A Survey of Research in Education Baroda</u>.
2. M.B. Buch (Editor) (1979)
   <u>Third Survey of Research in Education.</u>
3. M.B. Buch (Editor) (1986)
   <u>Third Surevey of Research in Education 1978-83.</u>
4. M.B. Buch (Editor) (1991)
   <u>Fourth Surevey of Research in Education 1983-88</u>
   <u>Volume - I</u>
5. M.B. Buch (Editor) (1991)

Fourth surevey of Research in Education 1983-88

Volume - II

6. B.M. Pandey. (1969)

Second National Survey of Secondary Feachers Education in India.

7. N.K. Patole (1982)

Educational Resarch in Universities in Maharashtra Platinium Jubili Year.

वरील संदर्भ ग्रथांतून प्रस्तुत संशोधनाशी संबंधित संशोधनांची समालोचन खालील प्रकारे केले आहे.

## २.३ संबंधित संशोधनाचे समालोचन :-

संदर्भ समिक्षणामुळे संशोधकास आपल्या विषयातील नाविण्या काम आहे ते मांडता येते. पूर्वीच्या संशोधनाचा उपयोग पायाभूत मानता येतो. संशोधनाचा दर्जा सुधारणा येतो. वेळ श्रम व पैसा यांचा योग्य तऱ्हेने व्यय करता येतो. म्हणून संबंधित संशोधनाचा अभ्यास करणे आवश्यक असते.

संशोधकाने खालील संबंधित संशोधनाचे समालोचन केले.

१) गोगटे श्री.ब.व.म.द.पाध्ये "मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयांचा सर्वकष अभ्यास"

एम.फील. पुणे १९८०[६]

* संशोधनाची उद्दिष्टे :-

१.मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालये, प्रयोगशाळा, अध्यापक वर्ग, विद्यार्थी समस्या, शैक्षणिक साधने, अर्थ व्यवस्था व परीक्षेचे निकाल इत्यादींचा अभ्यास करणे.

२.मराठवाडयातील परीक्षेचे काळात जे गैरप्रकार चालतात त्या कारणांचा अभ्यास करणे.

३.मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयांचे सर्वकष मूल्यमापन करणे.

४.मराठवाडयातील इयत्ता १२वीच्या वर्गाच्या निकालाचा अभ्यास करणे.

* संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, संस्था चालक, विद्यार्थी, पालक यांच्यासाठी वेगवेगळया प्रश्नावल्या तयार करुन माहिती गोळा करण्यात आली.

* कार्यपध्दती :-

संशोधकाने संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला. या पध्दतीद्वारे मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयातील संस्था चालक, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व पालक इत्यादी कडून प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा केली. काही कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षणे केली. प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या मुलाखती घेतल्या.

निष्कर्ष :-

१) मराठवाडयातील माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संख्या वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यायांच्या तुलनेत फारच कमी आहे.

२) कनिष्ठ महाविद्यालयांतील ५० टक्के विद्यार्थ्यांना इयत्ता १०वीच्या परीक्षेत ६० टक्के पेक्षा कमी गुण मिळाले आहेत.

३) उच्च माध्यमिक शिक्षणांची सोय तालुक्याच्या ठिकाणी किंवा मोठया गावी केली आहे.

४) मराठवाडयातील बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालये खाजगी संस्थाद्वारे चालविली जातात.

५) कनिष्ठ महाविद्यालयांत ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा सुविधा, क्रीडासाहित्य यांचा अभाव जाणवला.

६) इयत्ता १२ वीचा अभ्यासक्रम कठीण असल्याने निकाल कमी लागतो असे प्राचार्यांचे मत आहे.

७) परीक्षेतील गैर प्रकारांबाबत कडक कारवाई व्हावी अशी प्राचार्यांची भूमिका आहे.

८) मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयांना शैक्षणिक वातावरण अनुकूल नसल्याचे आढळले.

(२) कोटीकोला डी.सी. "बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास"

एम.फिल.प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. १९८५.[२]

* संशोधनाची उद्दिष्टे :-

१.बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांची सर्वसामान्य माहिती जाणून घेणे.

२.बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या सद्यस्थितीच्या समस्यांच्या अभ्यास करणे.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील वेळापत्रक, अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती अध्यापनाचे माध्यम, ग्रंथालय सुविधा, पाठयपुस्तके, प्रयोगशाळा सुविधा व परीक्षा याबाबत येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी सुधारणा सुचविणे.

* संशोधनाची साधने :-

संशोधकाने बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यासाठी प्रश्नावली तयार केली, त्याचबरोबर प्राध्यापकांसाठी मुलाखत सूची तयार करुन त्याद्वारे माहिती मिळविली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या दैनंदिन कामकाजाबाबत प्राध्यापकांना प्रश्न विचारले. त्याचबरोबर भेटी व निरीक्षण साधनांचाही उपयोग केला.

* संशोधन कार्यपध्दती :-

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला. संशोधकाने बेळगांव शहरातील ७ कनिष्ठ विद्यालयांची संशोधनासाठी निवड केली. तसेच संशोधनासाठी ७ प्राचार्यांची व ८५ प्राध्यापकांची निवड केली. कनिष्ठ

महाविद्यालयांत जाणवणाऱ्या समस्यांवर आधारित प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केली. संशोधकाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी दिल्या निरीक्षणाद्वारे भौतिक सुविधांची पाहाणी केली. त्यामध्ये वर्ग खोल्या, वर्ग खोल्यातील वातावरण, ग्रंथालय सुविधा इत्यादीची पाहणी केली.

* निष्कर्ष :-

१.बेळगांव शहरातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापक पदव्युत्तर पदवीधारक होते.

२.बेळगांव शहरातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांत कला व वाणिज्य शाखांचे वर्ग होते. विज्ञान शाखांचे वर्ग फक्त तीन कनिष्ठ महाविद्यालयात होते.

३.बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांत पाठयपुस्तकांची कमतरता आढळली नाही.

४.कनिष्ठ महाविद्यालयातील वेळापत्रक योग्य पध्दतीने तयार केलेले होते.

५.कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व्याख्यान पध्दतीचा अवलंब करतात.

६.बेळगांव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांत पाठयपुस्तके व संदर्भग्रंथ भरपूर होते.

७.विज्ञान शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा सुविधा भरपूर पुरविल्या जातात.

३.देशमुख पी.ए." अहमदनगर जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध अनुदानाचा विनियोग करताना प्रशासक या नात्याने प्राचार्यांना येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास "एम.फिल. प्रबंध[३]

* संशोधकाची उद्दिष्टे :-

१. प्राचार्यांना प्रशासन, विद्यार्थी संख्या, इमारत, फर्निचर , गंथालय, शैक्षणिक साधने, क्रीडा साहित्य, अभ्यासेतर कार्यक्रम या घटकावर अनुदानाची रक्कम खर्च करताना येणाऱ्या अडचणींची नोंद करणे.

२. ज्या घटकाशी अनुदान दिले जाते त्याचा त्याच घटकासाठी वापर होतो किंवा नाही ते पाहणे.

३.ज्या शैक्षणिक सुविधा व साधने कनिष्ठ महाविद्यालयांत आवश्यक आहेत परंतु अशा घटकांना अनुदान मिळत नसल्याने येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

४.माध्यमिक शाळांशी संलग्न व वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

* संशोधनाची साधने :-

संशोधकाने प्राचार्यासाठी प्रश्नावली तयार केली. त्या कनिष्ठ महाविद्यालयीन प्रशासन, इमारत, वर्ग संख्या, प्रयोगशाळा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे साहित्य, स्टेशनरी साहित्य इत्यादी घटकावर अनुदान खर्च करताना येणाऱ्या अडचणीवर प्रश्न विचारले.

* संशोधनाची कार्यपध्दती :-

संशोधकाने संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला. प्राचार्य हे कनिश्ठ महाविद्यालयांचे प्रमुख प्रशासक असल्याने त्यांच्याकडून माहिती गोळा केली. अहमदनगर जिल्हयातील शासकीय अनुदान मिळणारी सर्व कनिष्ठ महाविद्यालये अभ्यासासाठी निवडली. अशी कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळाशी संलग्न ५८ व वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न १८ निवडण्यात आली. एकंदर ७६ कनिष्ठ महाविद्यालयांचा अभ्यास केला.

* निष्कर्ष :-

१.कनिष्ठ महाविद्यालयांना प्रचलित नियमाप्रमाणे उपलब्ध सेवक वर्गाच्या सहाय्याने प्रशासकीय कामकाज पार पाडणे कठीण जाते.

२.वर्ग तुकडयांच्या अटीमुळे अनुदान मंजूरीवर मर्यादा पडतात.

३.इमारतीमध्ये वर्ग खोल्या अपुऱ्या असल्याने वर्ग खोल्यांची कमतरता निर्माण होते.

४.विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याने ग्रंथालय, क्रीडासाहित्य, प्रयोगशाळा साहित्य, शैक्षणिक साधने यांचा वापर प्रमाणानुसार होऊ शकत नाही.

५.प्रशासकीय कामकाजाच्या बाबतीत माध्यमिक शाळापेक्षा महाविद्यालयीन स्तरावर येणाऱ्या अडचणींचे प्रमाण जास्त आहे.

६.माध्यमिक शाळांपेक्षा महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक वर्गात जास्त विद्यार्थी संख्या आहे.

७.वरिष्ठ महाविद्यालयांच्या तुलनेत माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक साधने फारच कमी प्रमाणात आढळतात.

(४)जी.सी.पी.आय." अलाहाबाद येथील शासकीय उच्च माध्यतिक शाळांतील ग्रंथालय व वाचनालयाच्या स्थितीचा अभ्यास"

संशोधन अहवाल, १९८१.[४]

* <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :-

१.उत्तर प्रदेशातील सरकारी उच्च माध्यमिक शाळेतील ग्रंथालयाच्या सद्य स्थितीचा अभ्यास करणे.

२.या ग्रंथालयातील असमाधानकारक स्थितीला जबाबदार विविध घटकांचा शोध घेणे.

३.सरकारी उच्च माध्यतिक शाळांतील ग्रंथालयाच्या सद्यस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध शक्य बाबी सुचविणे.

* <u>संशोधनाची साधने</u> :-

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी प्राचार्य व विद्यार्थ्यांकडून माहिती संकलनाकरिता प्रश्नावली या साधनाचा वापर केला.

* <u>संशोधनाची कार्यपध्दती</u> :-

संशोधकाने या अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. शासकीय उच्च माध्यमिक शाळांच्या प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना प्रश्नावली देऊन माहिती संकलित केली. प्राप्त माहितीवरुन संख्याशास्त्रीय विश्लेषण केले. या संशोधनासाठी १० प्राचार्य व १० उच्च माध्यतिक शाळांतील प्रत्येकी १० विद्यार्थ्यांकडून माहिती घेऊन तिचे संकलन केले.

* निष्कर्ष :-

१.शासकीय उच्च माध्यतिक शाळांतील ग्रंथालयाची अवस्था समाधानकारक नव्हती, इमारत अपुरी होती, दुबार पध्दतीच्या शाळा सोडून इतर ठिकाणी स्वतंत्र वाचनालयाची सुविधा नव्हती तेथे प्रशिक्षित व पूर्णवेळ ग्रंथपाल नव्हते.

२.ग्रंथालय सेवा नियमित उपलब्ध नव्हती.

३.त्या ठिकाणी ग्रंथालय नवीन पुस्तके, नियतकालिके खरेदी करण्यासाठी कायम अनुदानाची सोय नव्हती. विद्यार्थी संख्या व नियतकालिकांची संख्या यात असंतुलन होते.

(५) पांडा एस.एन. "मुख्याध्यापक व त्यांच्याशी संबंधित त्या पार्श्वभूमीवरील विविध घटकाचे प्रशासकीय वर्तन पाहणे."
पीएच.डी. नागपूर, १९७९.

* संशोधनाची उद्दिष्टे :-

१.व्यवहारामध्ये मख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन आदर्श प्रशासकीय वर्तनानुसार आहे काय याचा शोध घेणे.

२.संस्था व शाळेचा दर्जा व परिणामकारकता यासंबंधी आदर्श व वास्तव प्रशासकीय वर्तन यामधील संबंधाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३.प्रशासकीय वर्तनामागील कार्यरत घटक कोणते आहेत याचा शोध घेणे.

* संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली व ती भरुन घेतली. तसेच मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण करण्यासाठी "काय स्क्वेअर" चाचणीचा उपयोग केला.

* संशोधनाची कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने एकंदर १६८ शाळांमधील २००० शिक्षकांचा अभ्यास केला. यासाठी राजस्थानातील निवडक शाळा घेतल्या. त्यासाठी स्तरीय नमुना निवड तंत्राचा आधार घेतला. तसेच माध्यमिक शहरी

विरुध्द ग्रामीण शहरी मुले, मुले विरुध्द मुली असा पाया गृहित धरला. मुख्याध्यापकांना आदर्श व वास्तव अशा स्वतंत्र प्रकारच्या विस्तृत माहितीची प्रश्नावली देऊन मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण "काय स्क्वेअर" चाचणीने केले.

* निष्कर्ष :-

१.प्रशासकीय वर्तनाबाबत मुख्याध्यापक जास्तीत जास्त आत्मकेंद्री अधिकारवादी, स्त्रीवादी आणि दळणवळणाबाबत कमी परिणामकारक, कमी सहकार्यशील, दुसऱ्यांबद्दल कमी सहानुभूती असणारे असे आढळले.

२.आदर्श प्रशासकीय वर्तनामध्ये मात्र दुसऱ्यांचा विचार घेणे, उत्पादक मुल्याधिष्ठिता, सहकार्य भावना, रचनात्मक आणि समायोजकता, उच्च शिक्षित प्रभाव, अशा बाबी होत्या.

३.कार्यक्षम शाळांचे मुख्याध्यापक इतरांचा अधिकाधिक सहयोग घेणारे कमी अधिकार गाजवणारे आणि सकारात्मक असे होते.

४.शहरी भागातील शाळांमध्ये असलेले मुख्याध्यापक अधिकाधिक जुळवून घेणारे, परिणामाचा विचार न करणारे, अधिक परिणामकारक संपर्क ठेवणारे आणि सकारात्मक आढळले.

५.तुलनात्मक दृष्टया मुलींच्या शाळांच्या मुख्याध्यापकांपेक्षा मुलांच्या शाळांचे मुख्याध्यापक मात्र कमी अधिकार गाजविणारे, कमी संपर्कशील परिणामाचा विचार कमी करणारे आढळले.

६.मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनातील कार्यरत घटक पुढील प्रमाणे आढळून आले.

अ) कार्य करणाचा शिक्षकांमधील फरक

ब) शिक्षकांचे गट

क) आसपासच्या वातावरणाच्या साक्षरतेच्या पातळीनुसार विद्यार्थ्यांच्या साक्षरतेच्या पातळीनुसार विद्यार्थ्यांच्या साक्षरतेच्या पातळीमधील फरक.

ड) अधिकाऱ्यांचा प्रशासनामधील हस्तक्षेप

इ) स्वतःचे कमी प्रतीचे समजणे (अपराधी गंड)

(६)गोगटे एस.बी."महाराष्टातील १९७६-७७ या शैक्षणिक वर्षातील कनिष्ठमहाविद्यालयीन द्वितीय वर्षातील सद्य परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास"

पीएच.डी. पुणे विद्यापीठ, १९७९.[६]

* संशोधनाची उद्दिष्टे:-

१.कनिष्ठ महाविद्यालयांच्या द्वितीय वर्षातील (इयत्ता १२वी) परिस्थितीचा अभ्यास करणे.

२.कनिष्ठ महाविद्यालयातील (इयत्ता १२वी) अडचणींचा शोध घेणे.

३.कनिष्ठ महाविद्यालयांत निर्माण होणाऱ्या अडचणींवर उपाय सुचविणे .

४.नव्या आकृतीबंधातील उच्च माध्यतिक स्तराचा अभ्यास करणे.

* संशोधनाची साधने :-

संशोधकाने प्रश्नावली, मुलाखती, चर्चा, बुध्दीमापन कसोटया इत्यादीद्वारे पुणे जिल्हयाचा पथदर्शक अभ्यास केला.

* संशोधनाची कार्यपध्दती :-

संशोधकाने संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला. पुणे जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालय, प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने, अभ्यासेतर कार्यक्रम, इमारत इत्यादीबाबत अभ्यास केला. महाराष्ट्रातील नव्या उच्च माध्यमिक या शैक्षणिक आकृतीबंधाचा शेजारील गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश,मध्यप्रदेश, गोवा या राज्यातील सदर स्तराशी तुलनात्मक अभ्यास केला.

* निष्कर्ष :-

१.शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना ग्रामीण भागापेक्षा चांगले शैक्षणिक वातावरण लाभले.

२.माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयापेक्षा वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय प्रयोगशाळा, अभ्यासेतर कार्यक्रम, शैक्षणिक साधने इत्यादी सुवधिा अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत.

३.माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यापेक्षा जास्त शिस्त व आज्ञाधारकपणा आढळला.

(७)जोशी पी.एम. "राजकोट शहरातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा शोध घेणे," १९८०."[७]

* <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :-

१.राजकोट शहरातील उच्च माध्यमिक शाळांच्या संदर्भात हेल्पीन आणि क्रॉप्टस्च्या अभ्यासाचे पुनरावलोकन करणे.

२.त्या शाळेचे संघटित वातावरण समजून घेणे व वर्गीकरण करणे.

३.प्रत्येक शाळासाठी आराखडा तयार करणे.

४.विविध प्रकारच्या शाळांच्या वातावरणाची तुलना करणे.

५.शाळेचा आकार, व्यवस्थापन स्थान आणि त्यातील अभ्यासक्रम यांचा संघटित वातावरणासह विविध शाळांमधून लिंगभेदानुसार अभ्यास करणे.

* <u>संशोधनाची साधने</u> :-

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण या साधनांचा वापर केला.

* <u>संशोधनाची कार्यपध्दती</u> :-

संशोधकाने या अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. याकरिता मुलाखत घेऊन त्यांच्या प्रशासकीय अभिलेखांचे निरीक्षण करुन माहिती संकलित करण्यात आली.प्राप्त माहितीवरुन विभागनिहाय विश्लेषण केले. शिक्षणाधिकाऱ्याला विस्तारित प्रश्नावली देऊन माहिती संकलित केली व प्राप्त माहितीचे विश्लेषण केले.

* निष्कर्ष :-

१.हेल्पीन व क्रॉप्टस् यांच्या संशोधनातून प्राप्त संघटित वातावरणाचे सर्व गट सर्व शाळामध्ये उपलब्ध हाते.

२.बंदिस्त वातावरणात असलेल्या शाळांची संख्या जास्त होती.

३.जिल्हयाच्या वातावरणातील शाळां दुसऱ्या क्रमांकावर होत्या व नियंत्रित वातवरणातील शाळा कमी होत्या.

४.खाजगी शाळा व शासकीय शाळा यांच्यात संघटित वातावरणात कोणताही फरक नव्हता.

५.विविध आकार व स्थान आणि त्यातील अभ्यासक्रम यांचा विचार करताना त्या शाळांमध्ये कोणताही फरक दिसून आला नाही.

(८)बराइया व्ही.व्ही. "गुजरात राज्यातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा चिकित्सक अभ्यास."
पीएच.डी. एस.पी.यु. १९८५.

* संशोधनाची उद्दिष्टे :-

१.गुजरातमधील उच्च माध्यमिक शाळांमधील संघटनात्मक वातावरणाचे वर्गीकरण करणे.

२.शाळेच्या संघटित वातावरणाचा शोध घेताना लिंगभेदाविषयीच्या पैलूंचा विचार करणे.

३.मुख्याध्यापकाचे नेतृत्व व संघटनात्मक वातावरणचा संबंध शोधून काढणे.

४.व्यवस्थापकीय व्यवहार व संघटित वातावरणाच्या संबंधाचा शोध घेणे.

५.मुख्याध्यापकाची वागणूक व त्याच्या तपशीलाचा संघटित वातावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

६.मुख्याध्यापकांच्या लिंगभेदाचा संघटित वातावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

७.व्यवस्थापन प्रकाराचा संघटित वातावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

८.उच्च माध्यमिक स्तराचा संघटित वातावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

९.शालेय परिसराचा संघटित वातावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

१०. मुख्याध्यापकाच्या वयाचा संघटित वातावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

* संशोधनाची साधने :-

संशोधकाने माहिती संकलनासाठी संस्थाप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांकरिता प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला.

* संशोधनाची कार्यपध्दती :-

संशोधकाने या अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. संस्थाप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा केली. यामध्ये १०० उच्च माध्यमिक शाळांमधून ५०० शिक्षक व १०० मुख्याध्यापक तसेच ७५ व्यवस्थपकीय सदस्यांकडून माहिती संकलित केली. उच्च माध्यमिक शाळांच्या संदर्भात व्यवस्थापन, संघटन, मुख्याध्यापक कार्य, परिसराचा वातारणावर पडणारा प्रभाव याबाबत निर्माण होणाऱ्या अडचणींचा शोध घेतला.

* निष्कर्ष :-

१.संशोधनासाठी निवडलेल्या १०० शाळांपैकी २७ शाळा मुक्त वातावरणात आढळल्या. ८ शाळा स्वायत्तपूर्ण वातावरणात होत्या. ११ शाळा नियंत्रित वातावरणात होत्या. ६ शाळा कौटुंबिक वातावरणात आढळल्या. १३ शाळा साचेबंद वातावरणात आढळल्या व बाकी ३४ शाळा बंदिस्त वातावरणात आढळल्या.

२. एकूण १०० मुख्याध्यापकांपैकी ४५ मुख्याध्यापकांचे प्रभावी नेतृत्व असलेले आढळले. ३० मुख्याध्यापकांच्या नेतृत्वात फारसा प्रभाव आढळला नाही. १३ मुख्याध्यापकांच्या कार्यातून नवोपक्रमाचा दृष्टिकोण आढळून आला. पण अंमलबजावणीत त्रुटी आढळून आल्या व १२ मुख्याध्यापकांचा अंमलबजावणीविषयीचा दृष्टिकोण उच्च होता. परंतू नवीन संकल्पना विषयीचे अज्ञान दिसून आले.

३.शाळेतील संघटित वातावरणावर निर्धारित घटकांचा शोध घेताना असे आढळून आले की विद्यार्थ्यांच्या लिंगभेदाचा व प्राचार्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करण्यात आला नाही.

४.ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये व्यवस्थापकाद्वारे पुरविलेल्या चांगल्या व निकृष्ट सहकार्याचा काहीही प्रभाव पडत नाही.

५.शालेय वातावरणावर व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या वयाचा प्रभाव पडत नाही.

(९) अमरनाथ "जालंदर जिल्हयातील शासकीय व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांमधील संघटित वातावरणाचा तुलनात्मक अभ्यास "
पीएच.डी. पंजाब विद्यापीठ, १९८०.[९]

* संशोधनाची उद्दिष्टे :-

१.शासकीय व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाच्या सर्वकष फरकाच्या प्रत्येक पैलूंचा शोध घेणे.

२.दोन्ही प्रकारच्या शाळांतील कामाच्या स्वरुपाचा शोध घेणे.

३.प्राचार्यांच्या वर्तनाचा व शिक्षकांशी असणाऱ्या संबंधांचा शोध घेणे.

४.प्राचार्य व शिक्षकांच्या सेवेतील कार्याचा आढावा घेताना गटांतर्गत वर्तनाचा शोध घेणे.

५.दोन्ही प्रकारच्या शाळातील संघटित वातावरणातील महत्वपूर्ण संबंधांचा शोध घेणे.

६.शासकीय व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातवरणाचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम अभ्यासणे.

* संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने हेल्पीन व क्रॉफ्टस् च्या प्रश्नावलीचा उपयोग केला.

* संशोधनाची कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला. त्याकरिता ३२ उच्च माध्यमिक शाळा जालंदर जिल्हायातील निवडल्या. प्रत्येक शाळेतील ९ शिक्षक व विद्यार्थ्यांची वार्षिक संपादणूक अभ्यासली. निकालांचा आढावा घेण्यात आला.

* निष्कर्ष :-

१.शासकीय व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांचा गटांतर्गत विचार करता संघटित वातावरणात महत्वपूर्ण फरक नव्हता. परंतू दोन्ही शाळांतील सहसंबंध समतल नव्हते. प्राचार्य व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना उच्च आदर्श घालून दिले.

२.दोन्ही प्रकारच्या शाळेतील प्राचार्यामध्ये नेतृत्व वर्तनाबाबत फरक नव्हता.

३.प्राचार्य व शिक्षकांच्या वर्तनात काही फरक नव्हता. शाळेतील संघटित वातावरणात मोकळेपणा होता.

४.दोन्ही प्रकारच्या शाळांमधील प्राचार्य व शिक्षकांच्या संघटित वातावरणातील संबंध चांगले होते.

५.शिक्षकांच्या सेवेतून संघटित वातावरणाचा प्रभाव दिसून आला.

६.त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूक व संघटित वातावरणाचा सकारात्मक संबंध नव्हता.

## २.४ समारोप :-

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाशी संबंधित असलेल्या संशोधनाचा अभ्यास केला आहे. वरील संशोधनांचे समालोचन केले असता कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनांतर्गत वेगवेगळया विभागासंदर्भात संशोधन झाले. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

उच्च माध्यमिक स्तरावर झालेल्या संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयांचा सर्वकष अभ्यास, कनिष्ठ महाविद्यालयांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास, कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध अनुदानाचा विनियोग करताना प्रशासक या नात्याने प्राचार्यांना येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास, उच्च माध्यमिक शाळातील

ग्रंथालय व वाचनालयाच्या स्थितीचा अभ्यास, १९७६-७७ या शैक्षणिक वर्षातील कनिष्ठ महाविद्यालयातील द्वितीय वर्षातील सद्य परिस्थितीचा चिकित्सक अभ्यास. इत्यादी विषय प्रशासनाशी संबंधित असल्याचे आढळून आले.

त्याचबरोबर संघटनात्मक वातावरणावर आधारित कांही विषयांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर संशोधन झाल्याचे आढळून आले. त्यामध्ये पुढील प्रकारचे विषय होते :- राजकोट शहरातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा शोध घेणे, गुजरात राज्यातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणचा चिकित्सक अभ्यास, जालंदर जिल्हयातील शासकीय व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा तुलनात्मक अभ्यास. इत्यादी विविध विषयावर संशोधन झालेले आहे.

पहिल्या संशोधनामध्ये मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या समस्यांचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास करताना संशोधकाने प्रशासनाशी संबंधित सम्पूर्ण घटकांचा विचार केला आहे. परीक्षाकाळातील गैरप्रकाराबाबतही अभ्यास करण्यात आला आहे.
त्याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालयातील निकालांच्या संदर्भात अभ्यास केला आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या संदर्भात दुसऱ्या संशोधनात बेळगाव शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. यातदेखील प्रशासनासंबंधी कनिष्ठ महाविद्यालय सर्वसामान्य माहितीचा अभ्यास करताना सद्यस्थितीचा अभ्यास केला आहे. ज्या बाबींची कमतरता आली त्यांचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या संदर्भात तिसऱ्या संशोधनात अहमदनगर जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध अनुदानाच्या विनियोगात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला आहे. यामध्ये मानवी व भौतिक घटकावर होणाऱ्या खर्चाविषयी माहिती व कनिष्ठ महाविद्यालयांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. यामध्ये येणाऱ्या अडचणी नमूद करुन उपाय सुचविले आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयांच्या संदर्भात चौथ्या संशोधनात अलाहाबाद येथील उच्च माध्यमिक शासकीय शाळातील ग्रंथालय व वाचनालयाच्या स्थितीचा अभ्यास केला आहे. यामध्ये संशोधकाने ग्रंथालयातील असमाधानकारक स्थितीला जबाबदार विविध घटकांचा शोध घेतला त्यावर विविध उपाय सुचविले आहेत.

पाचव्या संशोधनात मुख्याध्यापक व त्यांच्याशी संबंधित त्या पार्श्वभूमीवरील विविध घटकांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास केला आहे. या अंतर्गत आदर्श प्रशासनासंबंधी निकष ठरवून माहिती मिळविणे तसेच आदर्श व वास्तव प्रशासनाचा तुलनात्मक अभ्यास घेणे, तुलनात्मक अभ्यासावरुन आढळलेल्या फरकावर उपाय सुचविले आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित सहाव्या संशोधनात महाराष्ट्रातील १९७६-७७ या शैक्षणिक वर्षातील कनिष्ठ महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या सद्य स्थितीचा अभ्यास केला आहे. त्याअंतर्गत येणाऱ्या विविध अडचणींचा शोध घेतला आहे. त्यावर उपाय सुचविले आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित सातव्या संशोधनात राजकोट शहरातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा शोध घेतला आहे. त्या संदर्भात हेल्पीन आणि क्रॉफट्सच्या अभ्यासाचे पुनरावलोकन करण्यात आले आहे. विविध प्रकारच्या शाळांच्या वातावरणाची तुलना केली. संघटित वातावरणावर होणाऱ्या विविध भौतिक, मानवी घटकांचा परिणामाविषयी अभ्यास केला. त्यावर योग्य उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित आठव्या संशोधनात गुजरात राज्यातील उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातारणाचा चिकित्सक अभ्यास करताना संघटित वातावरणाचे वर्गीकरण केले. लिंगभेदाविषयी विचार केला, त्याचबरोबर मुख्याध्यापकाशी संबंधित विविध अंगाचा सखोल अभ्यास केला आहे. आढळून आलेल्या समस्या नमूद केल्या आहेत. व त्यावर योग्य उपाययोजना सुचविल्या आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित नवव्या संशोधनात जालंदर जिल्हयातील शासकीय व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांतील संघटित वातावरणाचा अभ्यास केला आहे. त्या अंतर्गत दोन्ही प्रकारच्या शाळांतील संघटित वातावरणाचा तुलनात्मक शोध घेतला आहे.

संघटित वातावरणाचा विद्यार्थ्यांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक व संघटित वातावरणाचा सकारात्मक संबंध नसल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यासंदंर्भात योग्य त्या उपाययोजना सुचविल्या आहेत.

अशाप्रकारे एकंदर सहा प्रशासनाशी संबंधित व तीन संघटित वातावरणाशी संबंधित असलेल्या संशोधनांचा अभ्यास करण्यात आला आहे.

वरील संशोधनातून कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित प्रशासन व संघटित वातारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन आणि प्रशासन योग्य पध्दतीने होण्याकरिता यासंदर्भात संशोधनाची गरज आहे. कारण कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रशासनाबरोबरच नियोजनाचे अत्यंत महत्व असल्याचे आढळते.

आत्तापर्यंत झालेल्या अभ्यासावरुन कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन व प्रशासनात कोणकोणत्या अडचणी येतात? कनिष्ठ महाविद्यालयांचे नियोजन कसे असावे ? कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रशासन कसे असावे ? या प्रश्नांचे स्पष्टीकरण होत नाही. या दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधन इतर संशोधनापेक्षा वेगळे आहे. म्हणूनच संशोधकाने कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाच्या चिकित्सक अभ्यासाठी निवड संशोधनासाठी केलेली आहे.

## संदर्भ


१. गोगटे श्री. ब. आणि म.द.पाध्ये (१९८०),
मराठवाडयातील कनिष्ठ महाविद्यालयाचा सर्वकक्ष अभ्यास
पुणे, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पृष्ठ- १ ते १३०.

२. कोटीकोला डी.सी., (१९८५), एम.फिल. पदवी प्रबंध
पुणे, विद्यापीठ, (अप्रकाशित प्रबंध)

३. देशमुख पी.ए.,(१९८९), एम.फिल. पदवी प्रबंध
पुणे, विद्यापीठ, (अप्रकाशित प्रबंध)

४. जी.सी.पी.आय., (१९८१), Cited by M.B. Buch(Edi) Third Survey of Research in Education New Delhi, NCERT, (1978-83) Page No. 889.

५. पांडा एस.एन., Cited by M.B.Buch (Edi) Second Survey of Research in Education Baroda, Centre of Advanced studies in Education Page No. 284.

६. गोगटे एस.बी., (1979), Cited by M.B.Buch (Edi) Third Survey of Research in Education.

७. जोशी पी.एम. (1980) Ibid, Page No. 901.

८. बराइया व्ही.व्ही., (1985) Cited by M.B.Buch(Edi) Fourth Survey of Research in Education. Volume II (1983-88) New Delhi NCERT Page No. 1073.

९. अमरनाथ, (1980) Cited by M.B. Buch (Edi) Third Survey of Research in Education Op Cit. Page No.-867.


13538
A